अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२०

**सन २०१५ व सन २०१६ च्या धोरण कालावधीत ज्या अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना नोंदणीपत्र देण्यात आले आहे, अशा प्रकल्पांना महाऊर्जाकडे नोंदणी करण्यासाठी द्वितीय मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः अपाऊ-२०२१/प्र.क्र.६९/ ऊर्जा-७.**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: -१७ जुन, २०२१

वाचा :-

१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.- अपाऊ-२०१५/प्र.क्र.४९/ ऊर्जा-७, दि. २०.०७.२०१५.

२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. अपाऊ-२०१५/प्र.क्र.३६७/ ऊर्जा-७, दि. ११.०२.२०१६.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. अपाऊ-२०२०/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७, दि. ३१.१२.२०२०

४) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. अपाऊ-२०२१/प्र.क्र.६९/ऊर्जा-७, दि. २२.०४.२०२१.

५) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे, यांचेकडील प्रस्ताव क्र. पीजीएन/जीएसपीपी-००२/२०२० -२१/१७४९, दिनांक ३०.०४.२०२१

प्रस्तावना :-

शासन निर्णय दिनांक ३१ डिसेंबर, २०२० अन्वये जाहीर करण्यात आलेल्या राज्याच्या नवीन अपारंपारिक ऊर्जा धोरण-२०२० अंतर्गत सन २०१५ व सन २०१६ च्या धोरण कालावधीत ज्या अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना नोंदणीपत्र देण्यात आले आहे, अशा प्रकल्पांची महाऊर्जाकडे नोंदणी करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत नोंदविण्यास अनुमती देण्यात आलेली आहे, मात्र सन २०२० मध्ये देशभरात कोरोना महामारीचा प्रार्दूभाव मोठया प्रमाणात वाढल्याने, देशात केलेला संपूर्ण लॉकडाऊन, त्यामुळे उद्भवलेली परिस्थिती इत्यादी बाबींमुळे अशा अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना वेळीच महाऊर्जाकडे नोंदणी करता आलेली नाही, तसेच सद्यस्थितीत राज्यात मोठ्या वेगाने वाढणारा करोना महामारीचा प्रार्दूभाव व त्यामुळे राज्यात उद्भवलेली लॉकडाऊन सदृश्य परिस्थिती पाहता अशा अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना महाऊर्जाकडे नोंदणी करण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तथापि, देशभरात कोरोना महामारीचा प्रार्दूभाव मोठया प्रमाणात वाढतच असल्याने महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे, यांनी उपरोक्त संदर्भ क्र. ५ अन्वये विनंती केल्यानुसार अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना नोंदणी करण्यासाठी द्वितीय मुदतवाढ दिनांक ३० जुन, २०२१ पर्यंत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्याचे नवीन अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० हे दिनांक ३१ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे. या धोरणानुसार सन २०१५ व सन २०१६ च्या धोरण कालावधीत ज्या अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना नोंदणी पत्र देण्यात आले आहे, अशा प्रकल्पांना संबंधित सन २०१५ व सन

२०१६ च्या धोरणांतर्गत प्रकल्पांची महाऊर्जाकडे नोंदणी करण्यासाठी खालील अटींच्या अधिन राहून द्वितीय मुदतवाढ दिनांक ३० जुन, २०२१ पर्यंत देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे,

१) सर्व नोंदणीकृत प्रकल्प विद्युत शुल्काच्या माफीचा (Exemption) लाभ प्राप्त करावयाचा देण्यास दिनांक ३० डिसेंबर, २०२१ पर्यंत प्रकल्प पूर्ण करून कार्यान्वित करणे आवश्यक राहील.

२) अद्याप नोंदणी न झालेल्या प्रकल्पांच्या प्रवर्तकांना त्यांचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करून महाउर्जा कडून (सन २०१५ च्या धोरणांतर्गत अनुज्ञेय प्रोत्साहनाचा लाभ घ्यावयाचा असल्यास) नोटीस पाठवून कमाल दिनांक ३० जून, २०२१ पर्यंतची मुदत देण्यात यावी.

३) महाऊर्जाद्वारे त्यांच्या विविध अपारंपारिक धोरणातील कालावधीत मान्य प्रकल्पांचा आढावा घेऊन त्यांचे वर्षनिहाय, स्त्रोत निहाय व धोरण निहाय प्रकल्पांची यादी ऊर्जा विभागाकडे सादर करावी व त्यायोगे किती प्रकल्पांच्या विविध प्रोत्साहननाचे अदा केलेले दायित्व व प्रलंबित दायित्व याबाबतची माहिती देण्यात यावी.

४) अपूर्ण प्रकल्पांना दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत त्यांच्या प्रकल्प पूर्तीच्या कालावधीची माहिती घेऊन असे प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते, याच्या माहितीसह असे प्रकल्प त्वरित बंद करण्याच्या दृष्टीने (अनुज्ञेय प्रोत्साहनाचे प्रलंबित दायित्व) म्हणजेच त्यांना धोरणाचे अनुदान अनुज्ञेय राहणार नाही या दृष्टीने धोरणात्मक प्रस्ताव सर्व पैलूंचा अभ्यास करून त्याच्या फायदे तोट्यासह सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०६१७१६५२२८८६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nanasaheb Rajaram Dhane

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries, Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a71698611123263cde9d32423e9bb73044d91ed0cffad3b6267198ee5014159f, serialNumber=6c39e2858150dbdfcfe6cd25ed08adf59f4d2fd8c1ede1730735f604904bf3bb, cn=Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2021.06.17 17:04:08 +05'30'

**( ना. रा. ढाणे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मंत्री / सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. सर्व विधानमंडळ सदस्य, विधान भवन, मुंबई,
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक,सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
१३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१५. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सूत्रधार कंपनी मर्या.,मुंबई,
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
२०. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),पुणे,
२१. उप सचिव/ ऊर्जा-३, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२. ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३. निवड नस्ती,ऊर्जा-७, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.